धर्मराज्य पक्ष

अध्यक्ष
राजन राजे

संदर्भ क्र.________

दिनांक : १५/११/२०१४

**प्रसिध्दीसाठी**

# मराठा आरक्षणास स्थगिती दिल्याबद्दल ‘धर्मराज्य’ कडून न्यायालयीन निर्णयाचे स्वागत

**प्रतिनिधी**

दि. १५ – मराठा आरक्षणाला स्थगिती दिल्याबद्दल उच्च न्यायालयाच्या निर्णयाचे **‘धर्मराज्य पक्षा’**चे अध्यक्ष **राजन राजे** यांनी स्वागत केले आहे. मराठा व मुस्लिम आरक्षणाला विरोध करणारी जनहित याचिका **‘धर्मराज्य पक्षा’**चे महासचिव **अनिल ठाणेकर** यांनी दाखल केली होती.

मराठा समाजाला सरकारी नोकऱ्या व शिक्षणाच्या प्रवेशांमध्ये १६ टक्के व मुस्लिम समाजासाठी सरकारी नोकऱ्या शिक्षणामध्ये ५ टक्के आरक्षण लागू करण्याचा निर्णय राज्य सरकारने ९ जुलै-२०१४ रोजी लागू केला होता. याविरोधात **‘धर्मराज्य पक्षा’**चे महासचिव अनिल ठाणेकर यांच्यावतीने ॲड. आशिष मेहता यांनी जनहित याचिका दाखल केली होती. यावर निर्णय देताना उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश न्या. मोहित शहा व न्या. एम. एस. सोनाक यांच्या खंडपीठाने मराठा आरक्षणाला स्थगिती दिली आहे. तर मुस्लिम समाजाला तूर्त शैक्षणिक आरक्षण लागू राहणार आहे. उच्च न्यायालयाच्या या निर्णयाचे **राजन राजे** यांनी स्वागत केले आहे.

मराठा व मुस्लिम आरक्षणामुळे महाराष्ट्रातील आरक्षण ५२ टक्क्यांवरून ७३ टक्क्यांवर पोहोचले होते. यामुळे सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या ५० टक्के आरक्षण मर्यादांचे उघड उल्लंघन झाले होते, तसेच राज्यघटनेने धार्मिक आधारावर निषिध्द ठरविलेल्या निर्देशाचेही उल्लंघन झाल्याचे याचिकाकर्ते अनिल ठाणेकर यांचे वकिल ॲड. आशिष मेहता यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले.

------ ### ------

ए/एर०३, ‘पांचजन्य’-२, रिगलप्लाझा-लोकपुरम प्रिमायसेस् को.ऑ.हौ. सोसायटी, ग्लॅडीज् अल्वारिस मार्ग, पोखरण रोड नं.२, ठाणे (प.)-४०० ६१०, दूरध्वनी : २१७१ ६७२१ / ८१०८१ २५०००

७/६०१-६०२, ‘पांचजन्य’, शुभारंभ, फेज-१, कोकणी पाडा मार्ग, द्वारा-घोडबंदर रोड, मानपाडा, ठाणे (प.)-४०० ६१०. दूरध्वनी : ६५२७ ०००१ / २७७९ ०६७००